# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/04/2023 (बुधवार) सायंकाळ

---

## कोळसा चोरी

पो.स्टे. पारशिवनी :— अंतर्गत १० किमी अंतरावर मौजा ओ, बि, डपिंग डब्ल्यु सी एल येथे दिनांक ११/४/२०२३ चे ०७/४५ वा. दरम्यान पेट्रोलिंग दरम्यान नेमलेले एम. एस. ए चे जवान नामे— कैलास वाघ, समीर शेख हे सिंगोरी परिसरात सकाळी ०७.०० वा. पेट्रोलिंग करित असतांना ओ. बी. डपिंग यार्ड येथुन एम इसम मोटरसायकल क्र. एम एच—४० ई—१४१६ वर ६ बोरी मध्ये अंदाजे ३९० किलो कोळसा प्रति ६ रू. प्रमाणे एकुण किंमती २३४०/— रूपयाचा मुद्देमाल चोरी करून नेत असतांनी मिळुन आल्याने त्याला त्याचे नाव विचारले असता **मंगेश दशरथ बावने वय ३० वर्ष, रा. वाघोडा वार्ड क्र. १ पारशिवनी** असे सागितल्याने सदर आरोपीच्या ताब्यातुन ३९० किलो कोळसा प्रति ६ रू. प्रमाणे एकुण २३४०/— रू. व मो. सा. क्र. एम एच—४० ई—१४१६ किंमती अंदाजे ८०००/— रू. असा एकुण १०३४०/— रूपयाचा मुद्देमाल मिळुन आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा ८७८ सुरेश धुर्वे मो. नं ९९२२९३५८७८ हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. मौदा :— दिनांक ११/०४/२०२३ चे १८/०० वा. ते १८/१५ वा. दरम्यान पीडिता/फिर्यादी वय ४० वर्ष ही महार जातीची असुन यातील **आरोपी नामे— नरेश नत्थु नरू, रा. दिघोरी काळे ता. कामठी जि. नागपुर** हे कुणबी जातीचे आहेत नमुद घटना ता वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी ही आपल्या घरासमोर उभी असता यातील आरोपी याने यातील फिर्यादीस जातीवाचक अशी शिवीगाळ केली तेव्हा यातील फिर्यादी यांनी तु मला शिवीगाळ का करतो असे म्हटले असता यातील आरोपी हा फिर्यादीस म्हणाला की ''तु माझ्या घराकडे जाणाऱ्या रोडवर दाळ पापड शेवया भांडे का वाळु घातले आहे'' असे म्हटले तेव्हा यातील फिर्यादी हिने तुझ्या घरी दाळ शेवया पापड भांडे वाळु टाकले नाही असे म्हटले तेव्हा यातील आरोपी याने हातबुक्क्यांनी मारहाण करुन केस पकडुन खाली पाडले व मायरीन घेदडीन असे म्हणुन जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, २९४, ३२३, ५०६, भादवी सहकलम ३(१) (एस), ३(२) (५) अनुसुचित जाती अनुसुचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक खराबे पोस्टे मौदा मो. क्र. ९९२३४३८३५५ हे करीत आहे.

## दुखापत

**पो.स्टे. नरखेड** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील नरखेड येथे दिनांक ११/०४/२०२३ चे १७/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— श्रीमती उषा अर्जुन तागडे, वय ६० वर्षे, रा. वार्ड क्र. ०२ नरखेड व आरोपी नामे— हेमराज बालपांडे रा. वार्ड क्र ०२ नरखेड हे एकमेकांचे शेजारी असुन त्यांचा घराचे जागेवरून कोर्टात केस चालु आहे. घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे जागेवर आरोपी यांचे पत्नी यांनी गहु वाळत टाकले असता फिर्यादी यांचे पत्नी यांनी आरोपी यांना हटकले असता आरोपी यांचे पत्नी ने शिवीगाळ करून ही जागा तुझे बापाची आहे का असे म्हणुन झगडा भांडण केले तेवढयात फिर्यादी यांचा मुलगा आला असता आरोपी यांनी शिवीगाळ करून काडीने डोक्यावर मारहाण केली त्यामुळे डोक्याला मार लागुन जखम होउन रक्त निघाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार १५९८ शैलेश डोंगरदिवे मो. नं. ७०५७४०१५९८ पोस्टे नरखेड हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**